- 4 JUL 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय प्रकल्पाच्या प्रमुखपदी डॉ. ज्योती जाधव

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागातर्फे (डीबीटी, नवी दिल्ली) रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेबाबत संशोधनासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे. विशेष म्हणजे तीन विद्यापीठांमध्ये संयुक्तरित्या होणाऱ्या या राष्ट्रीय प्रकल्पाचे नेतृत्व शिवाजी विद्यापीठाच्या जीव-रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा.डॉ.ज्योती जाधव यांच्याकडे देण्यात आले आहे.

स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत हा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून शिवाजी विद्यापीठासह इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, हैद्राबाद आणि चारोतर युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, गुजरात या तीन संस्थांमध्ये या प्रकल्पाबाबत संशोधन होणार आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये डॉ. ज्योती जाधव या प्रकल्प प्रमुख तर प्रा. एस.पी. गोविंदवार उप-प्रकल्प प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत.



कोल्हापूर : राष्ट्रीय प्रकल्पाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. भारती पाटील, डॉ. अनिल घुले, डॉ. एस.बी. सादळे.

डॉ. जाधव म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठात 'बायोरिमेडिएशन' प्रक्रियेने रंगमिश्रीत सांडपाणी स्वच्छ करण्याची पद्धत प्रायोगिक तत्त्वावर जवळपास गेल्या दहा वर्षांपासून केली जात असून या प्रयोगशाळेचा या क्षेत्रात जगात प्रथम क्रमांक आहे. याच कामाची दखल घेऊन डीबीटी (नवी दिल्ली) यांच्या वेबसाईटच्या होमपेजवर दोन वेळा झळकण्याचा बहुमान विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागाला दोनदा प्राप्त झाला आहे.

**कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार**

दरम्यान, डीबीटी यांचेकडून हा अत्यंत महत्वाचा प्रकल्प मंजूर झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी डॉ. ज्योती जाधव यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार केला. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील, डॉ. अनिल घुले, डॉ. एस. बी. सादळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

4 JUL 2017
तरुण भारत

# डॉ. रासम यांनी विद्यार्थ्यांना न्याय दिला

## प्रा. डी. यु. पवार यांचे प्रतिपादन : सेवानिवृत्तीबद्दल डॉ. रासम यांचा सत्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राज्यशास्त्र विषयातून शिक्षण घेवून शेकडो विद्यार्थी शासकीय सेवेत व महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजू झाले आहेत. विद्यार्थ्यांनी एकदा राज्यशास्त्र विभागात प्रवेश घेतला, की पीएच. डी. करूनच विद्यार्थी बाहेर पडतो. या विद्यार्थ्यांना सर्वोत्परी मदत डॉ. रासम करतात. त्यांनी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना न्याय दिला आहे, असे प्रतिपादन प्रा. डी. यु. पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. वासंती रासम सेवा गौरव सत्कार समितीतर्फे राज्यशास्त्र विभगातील डॉ. वासंती रासम यांचा सेवानिवृत्तीबद्दल डी. यु. पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. प्रा. बी. बी. पाटील यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.

प्रा. पवार म्हणाले, सामाजिक कार्य म्हणून प्रा. के. के. कावळेकर यांनी अनेक विद्यार्थ्यांना नोकरीची संधी दिली. हाच वारसा डॉ. रासम यांनी कायम ठेवत, विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून दिली. राजकारणाविषयी समाजामध्ये जनजागृती निर्माण केली. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी संशोधन केले. अनेक विद्यार्थी भारतासह परदेशातही विविध पदावर कार्यरत आहेत. डॉ. रासम यांनी सामाजिक संस्थेचे स्थापना



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाच्या डॉ. वासंती रासम यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करताना प्रा. डी. यु. पवार. सोबत प्रा. बी. बी. पाटील, प्रतापचंद्र रासम.

करून सामाजिक कार्यात सक्रीय झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

डी. बी. पाटील म्हणाले, तरूणांनी राजकारणात आले पाहिजे यासाठी डॉ. रासम यांनी प्रयत्न केले. राज्यशास्त्राचे विद्यार्थी राजकारणात उतरल्याशिवाय सत्तेत योग्य व्यक्तीची निवड होणार नाही. राजकीय सत्तेचा वापर करीत समजिक सेवादेखील केली पाहिजे. सत्काराला उत्तर देताना डॉ. रासम म्हणाल्या, पालकांनी व समाजाने मुला-मुलींना समान हक्क दिला पाहिजे. त्यांच्या आवडीनुसार शिक्षण देवून संबंधीत क्षेत्रात विद्यार्थी कसा प्राविण्य प्राप्त करेल याकडे लक्ष दिले पाहिजे. विद्यापीठात १९८६ ला सहाय्यक प्राध्यापक म्हणून रूजू झाले. तेंव्हापासून अनेक व्यक्तींनी सहकार्य केले, त्याबद्दल कायम त्यांची ऋणात राहणे पसंत करेन. यापुढेही विद्यार्थ्यांना पाहिजे ती मदत करण्यास तत्पर राहीन, असे आश्वासन विद्यार्थ्यांना दिले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, माजी परिक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, प्रतापचंद्र रासम, प्रा. ए. आर. आडसुळ, रवळनाथ फायनान्स कोऑपरेटीव्ह सोसायटीचे मल्लाप्पा चौगुले, वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.